**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## समाजाभिमुख संशोधनावर जास्तीतजास्त प्रोजेक्ट सादर व्हावे - डॉ. प्रगती गोखले

## विद्यापीठात 'विद्यापीठ प्रणालीमार्फत विज्ञान व तंत्रज्ञान अर्जासाठी सहाय्य' यावर एकदिवसीय वेबिनार संपन्न

**अमरावती -**

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाकडून समाजाभिमुख संशोधन प्रकल्पासाठी अनुदान दिले जात असून संशोधनपर जास्तीतजास्त समाजाभिमुख प्रोजेक्ट शिक्षकांनी सादर करावे, अशी माहिती राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशनच्या सल्लागार डॉ. प्रगती गोखले यांनी दिली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने 'विद्यापीठ प्रणालीमार्फत विज्ञान व तंत्रज्ञान अर्जासाठी सहाय्य' या विषयावर एकदिवसीय जागरुकता वेबिनारचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, नवोपक्रम व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, केंद्राचे समन्वयक डॉ. संदीप वाघुळे, विकास विभागाचे उपकुलसचिव विक्रांत मालवीय ऑनलाईन उपस्थित होते.

प्रस्तावासंदर्भात मार्गदर्शन करतांना डॉ. गोखले म्हणाल्या, संशोधन प्रकल्पासाठी राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशन विद्यापीठामार्फत पाच लक्ष रुपये देत असून त्यापेक्षा अधिक अनुदानासाठी सरळ आयोगाकडे प्रस्ताव पाठवावे लागतात. यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक विभागातील शिक्षकांनी आपले प्रस्ताव सादर करावे, अशा मार्गदर्शकपर सूचनांसह प्रोजेक्ट सादर करण्यासाठी करावयासाठी अर्ज, त्याची प्रक्रिया, ज्या क्षेत्रामध्ये संशोधन सादर करु इच्छिता. त्याबाबत कशा पद्धतीने संशोधन प्रकल्प सादर करता येतील, यावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. संशोधन प्रकल्प सादर करतांना परिपूर्ण असावा, त्याचा फायदा समाजाला झाला पाहिजे, हा मुख्य उद्देश असायला हवा. अमरावती विद्यापीठातून जास्तीतजास्त संशोधन प्रकल्प शिक्षकांकडून सादर होतील, अशी अपेक्षा व्यक्त करुन सविस्तर सादरीकरण याप्रसंगी त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, गेल्या तीन-चार वर्षात इतर वित्तीय संस्थांकडून संशोधनासाठी अनुदान प्राप्त होवू शकले नाही, तरी राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशन अंतर्गत असलेल्या प्रकल्पांवर संशोधन करण्यासाठी अनुदान प्राप्त होत आहे. यासाठी विद्यापीठाने त्या संस्थेशी सामंजस्य करारसुद्धा केला आहे. १९ जानेवारी, २०२१ अंतीम तारीख प्रस्ताव सादर करण्यासाठी असून ज्यांना प्रस्ताव सादर करावयाचे आहेत, त्यांनी त्यापूर्वी आपले प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. याशिवाय प्रस्तावासंदर्भातील अटी, शर्ती, मार्गदर्शकांची यादी, प्रोजेक्टची यादी, क्षेत्र, विविध प्रपत्रे, याबाबतची माहिती देवून सर्व संबंधितांनी आपले प्रस्ताव संस्थाप्रमुख किंवा विभागप्रमुखांच्या माध्यमातून सादर करावे, असेही ते म्हणाले. वेबिनारमध्ये सहभागींकडून विचारलेल्या प्रश्नांना प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, सल्लागार डॉ. प्रगती गोखले व अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी यांनी समपर्क उत्तरे दिलीत.

सुरुवातीला प्रास्ताविकतेतून सविस्तर माहिती नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांनी दिली. संचालन राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. संदीप वाघुळे यांनी, तर आभार विकास विभागाचे उपकुलसचिव विक्रांत मालवीय यांनी मानले. वेबिनारला विज्ञान, अभियांत्रिकी, फार्मसी, कॉस्मेटिक टेक्नॉलॉजीच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठातील विभागप्रमुख ऑनलाईन उपस्थित होते.

---

प्रति,                                                                                **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                                 दि. ११/१२/२०२०.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 159